प्रेसनोट दि. २३/०६/२०१९

## गॅस गोडावुन मध्ये बांधुन डांबुन ठेवुन मारहाण प्रकरणातील मुख्य सुत्रधार कुख्यात गुंड गोटया मुळे युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि. ०७/०६/२०१९ रोजी आतिष स्वामी पवार याने मित्रांना मारले होते, म्हणून गोटया मुळे याने मित्रांबरोबर जावून त्याला गॅस गोडावुन येथे घेवुन जावुन हातपाय बांधुन डांबुन ठेवुन मारहाण केली होती त्याबाबत मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर १२३/२०१९ भादविक ३४२, ३२४, ३२३, ५०६(२), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यापैकी काही आरोपी दाखल गुन्हयांत अटक करण्यात आले होते सदर गुन्ह्यातील मुख्य सुत्रधार अजय उर्फ गोटया मुळे आरोपी अद्याप फरारी आहेत

युनिट -१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी फरारी व पाहिजे आरोपी चेक करीत असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमीदारामार्फत मिळाली की सदर गुन्हयांत फरारी असलेला आरोपी गोटया मुळे हा बैलबाजार मार्केटयार्ड येथे आला आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळावल्याने त्या बाबत वरिष्ठांना माहिती देवुन वरिष्ठांचे परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफसह बातमी प्रमाणे जावुन नमुद आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव गोटया ऊर्फ अजय भागप्पा मुळे, वय २६ वर्ष, रा. ५७०,आंबेडकर नगर, गल्ली नं ३, मार्केटयार्ड, पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचेकडे मार्केटयार्ड पोलीस ठाण्याकडील वरील दाखल गुन्हयाचे बाबत विचारणा करता, त्याने आमच्या वस्तीतील आतिष पवार याने माझ्या मित्रांना मारले होते, म्हणून मी माझ्या मित्रांबरोबर जावून त्याला आम्ही गॅस गोडावुन येथे घेवुन जावुन हातपाय बांधुन डांबुन ठेवुन मारहाण केली होती, असे सांगुन त्याच्याशी झालेल्या भांडणावरुन मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे व तेव्हा पासुन मी फरार आहे असे सांगितले आहे . दाखल गुन्ह्याबाबत मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात खात्री करता सदर इसमांविरुध्द वरील नमुद गुन्हा दाखल असुन त्यामध्ये ते पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.असल्याने पुढील कारवाई कामी त्यास मार्केटयार्ड पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर आरोपीचे विरुध्द खंडणी,दरोडयाची तयारी,जबरीचोरी,मारामारी, हत्यार बाळगणे अशा प्रकारच्या एकुण १० गुन्हे दाखल आसुन सदर आरोपी वर सन २०१८ मध्ये एम.पी.डी.ए. प्रमाणे कारवाई झाली होती.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक दिनेश पाटील, पोलीस कर्मचारी अमोल पवार, अनिल घाडगे,अजय थोरात, बाबा चव्हाण,वैभव स्वामी यांनी केली आहे.